# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 11 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ११ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- भारत नशामुक्त झाल्याखेरीज विकसित भारताचं निर्माण शक्य नाही–केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- प्रदुषण नियंत्रणात योग्य कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचा इशारा
- छत्रपती संभाजीनगर इथं २२ मोठ्या प्रकल्पांच्या माध्यमातून ३५ हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार–उद्योगमंत्री उदय सामंत यांची माहिती
- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या सर्व आरोपींविरुद्ध मकोका लागू

आणि

- जालना इथं आयोजित तीन दिवसीस महाचिंतनीचा समारोप

****

विकसित भारताचं निर्माण हे, भारत नशामुक्त झाल्याखेरीज शक्य नसल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत ‘अंमली पदार्थ–तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा’ या विषयावरच्या परिषदेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते. नशामुक्त भारतासाठी केंद्र आणि राज्यांनी एका व्यासपीठावर येऊन काम करायला हवं, असं आवाहन शहा यांनी यावेळी केलं. अंमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा मोहिमेचं तसंच मानस – दोन या हेल्पलाईन सेवेच्या सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या विस्ताराचं उद्घाटनही अमित शहा यांच्या हस्ते झालं. गेल्या दहा वर्षांत सुमारे २४ लाख किलो अंमली पदार्थ जप्त

करण्यात आले, पुढच्या काही दिवसांतही अंमली पदार्थांचा मोठा साठा नष्ट करण्यात येणार असल्याचं, शहा यांनी सांगितलं, ते म्हणाले –

***लगबग एक लाख किलोग्रॅम मादक द्रव्यपदार्थ जिसका मूल्य छियासी सौ करोड रूपया है, उसको अगले सप्ताह दस दिन के अंदर जलाया जायेगा। चौर मै मानता हूं की इससे ये विनिष्टीकरण से एक मजबूत संदेश जनता के बीच मे जानेवाला है। इससे और संकल्पवान प्रयास वर्ष 2025 मे हमारे होंगे।***

दरम्यान, अमित शहा उद्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून ते शनिशिंगणापूर आणि शिर्डीला भेट देणार आहेत. शिर्डीमध्ये होणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या राज्य अधिवेशनाला ते उपस्थित राहणार आहेत.

****

अयोध्येतल्या रामलल्ला अभिषेकाच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी हे दिव्य आणि भव्य राम मंदिर प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी समाज माध्यमांवर व्यक्त केला. अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून विशेष कार्यक्रम सुरू होत आहेत. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा झाली होती, परंतु तिथीनुसार आजपासून हा उत्सव साजरा केला जाणार आहे.

****

युवकांना शालेय जीवनातच वाहतुकीच्या नियमांचे धडे मिळणं आवश्यक आहे, शालेय विद्यार्थ्यांवर चांगल्या गोष्टींचा प्रभाव पडला तर तो कायमस्वरुपी राहतो, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत नागपुरात प्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांनी गडकरी यांची मुलाखत घेतली, त्यावेळी ते बोलत होते. दरवर्षी रस्ते अपघातामध्ये होणाऱ्या मृत्यूबाबत गडकरी यांनी यावेळी खंत व्यक्त केली.

****

प्रदुषण नियंत्रणात योग्य कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं यासंदर्भात विविध विभागांची बैठक घेतल्यानंतर त्या बोलत होत्या. नद्यांमधल्या

जलप्रदुषणाला आळा घालण्यासह नदी पुनरुज्जीवनासंबंधी त्यांनी यावेळी भूमिका मांडली. त्या म्हणाल्या –

***महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी वॉटर पल्युशनचा फार मोठा विषय आहे. वेस्ट मॅनेजमेंट जे महानगरपालिकांचं आहे, ज्याला आमचं जे खातंय ते बजेट देतं पण ते बजेट ते खर्च करत नाहीयेत. याचाही मी चांगला आढावा घेतलाय. आणि कोस्टल रोडमध्ये पण जे प्रदुषण आहे, त्याचाही चांगला आढावा घेतलाय. आणि या लोकांना चांगल्या पद्धतीने नोटीसा बजावण्यात येतील. त्यांनी जर त्यांच्या कामामध्ये कचुराई केली, तर त्यांच्यावर ॲक्शन घेण्यात येईल. आणि या प्रदुषणाच्या बद्दल कडक कारवाई करण्यात येईल. नदी पुनर्जीवनाचं एक चांगलं काम त्याच्यातनं करता येईल. नद्या ज्या प्रदुषित होतायत, त्या नद्या एक एक नदी प्रत्येक ठिकाणाची घेऊन त्याच्यावर आम्ही एस टी पी लावून त्याच्या बाबतीत काय करता येईल.***

****

छत्रपती संभाजीनगर इथं औद्योगिक परिसरात २२ मोठ्या प्रकल्पांनी भूखंडाची मागणी केली असून या माध्यमातून ३५ हजार कोटी रुपये गुंतवणूक येणार असल्याची माहिती, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं यासंदर्भातल्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलत होते. मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी औद्योगिक वसाहत उभी करण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्याचंही सामंत यांनी सांगितलं. मराठवाड्यात उभारण्यात येत असलेल्या उद्योग भवनांबाबत त्यांनी माहिती दिली.

***मराठवाड्यामध्ये चार उद्योग भवन आपण बांधतोय. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव. याची कामं सुरू झालेली आहेत. काही कामं ही पहिल्या स्लॅबपर्यंत आलीत, दुसऱ्या स्लॅबपर्यंत आलीत. येत्या वर्षभरात ही कामं पूर्ण होतील.***

दरम्यान, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्या निमित्ताने महाराष्ट्र शासन आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने अभिनंदन सोहळा घेण्यात येत आहे. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत विद्यापीठ परिसरात हा कार्यक्रम होत आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंध कायदा–मकोका लागू करण्याचे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी याबाबत आज माहिती दिली.

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणातले आरोपी तसंच परभणी इथल्या सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणातल्या दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी, या मागणीसाठी आज वाशिम इथं सर्व पक्षीय, सर्व धर्मीय संघटनांकडून मोर्चा काढण्यात आला. वाशीमचे खासदार संजय देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर या मोर्चात सहभागी झाले.

****

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्राध्यापक डॉ. पृथ्वीराज तौर यांना दिल्ली इथं होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला विशेष निमंत्रित करण्यात आलं आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्या पार्श्वभूमीवर हे निमंत्रण मिळणं अभिमानास्पद असल्याची भावना डॉ. तौर यांनी व्यक्त केली आहे.

***माझ्या आयुष्यातल्या एकूण परमोच्च आनंद क्षणांपैकी हा एक क्षण आहे असं मला वाटतंय. मी जे काम मागच्या तीन दशकांपासून करतोय, मागच्या तीस वर्षांपासून भाषांतर, प्रत्यक्ष कविता लेखन, आणि नंतर मागच्या वीस वर्षांपासून मराठी भाषेतल्या संदर्भातला काही संशोधन करतोय, त्या एकूणच कार्याचा हा सन्मान आहे, असं मला वाटतंय. हा सन्मान केवळ माझाच आहे असं नाही, तर मी ज्या ठिकाणी काम करतोय त्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचाही सन्मान आहे.***

****

जालना इथं आयोजित तीन दिवसीस महाचिंतनीचा आज समारोप झाला, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यावेळी उपस्थित होते. चक्रधर स्वामींनी मानवधर्माला सर्वोच्च प्राधान्य दिलं, अज्ञान, अंधश्रद्धेतून समाजाला मुक्त करण्याचं कार्य केलं, त्यासोबतच वर्ण, जाती, व्यवस्थेला आव्हान दिलं, असं बागडे यावेळी

म्हणाले. नागपूर इथले संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. कोमल ठाकरे यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते यंदाचा चिंतनी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

****

तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी महोत्सवाच्या पाचव्या दिवशी आज पारंपरिक जलयात्रा काढण्यात आली. सकाळी ६ वाजता निघालेल्या या यात्रेत पापनाश तीर्थ कुंडातील पाणी भरलेले कलश डोक्यावर घेतलेल्या असंख्य महिला भाविक सहभागी झाल्या. तुळजाभवानी मातेची विधिवत पूजा करुन या तीर्थाने श्री तुळजाभवानी मातेचा गाभारा धुण्यात आला, त्यांनतर देवीचे सिंहासन अभिषेकपूजा करण्यात आली, अशी माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज खासदार संदिपान भुमरे यांच्या हस्ते सिध्दा महोत्सवाचं उद्धघाटन करण्यात आलं. या महोत्सवात विविध वस्तूंचे एकूण ४५ स्टॉल उभारण्यात आले आहेत. ग्रामीण परिसरातील महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून शहरवासीयांनी आपल्या कुटुंबासमवेत भेटी देऊ मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचं आवाहन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांनी केलं आहे.

***महिला बचत गटांमार्फत उत्पादित साहित्य आणि खाद्य सामग्रीचे विक्री आणि प्रदर्शन संदर्भात मी आपल्या सर्वांना विनंती करतो की सिद्धा महोत्सव आपण आयोजित करत आहोत. आणि त्यामध्ये जास्तीत जास्त लोकांनी भेट द्यावी. त्यांना प्रोत्साहन द्यावं. आणि यांच्या उत्पादित वस्तुंचं तुम्ही खरेदी करून त्यांच्या आर्थिक उत्पन्नाला हातभार लावावा.***

****

नांदेड जिल्ह्यात सांडपाणी व्यवस्थापनासाठी नरेगा अंतर्गत प्रत्येक घरासाठी वैयक्तिक शोषखड्ड्यांची उभारणी करण्याचे निर्देश, नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी दिले आहेत. त्या आज नांदड इथं एका कार्यक्रमात बोलत होत्या. जल जीवन मिशन अंतर्गत घरांमध्ये पाण्याच्या नळजोडणीसोबतच सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्ड्यांची उभारणी अनिवार्य करण्यात आली आहे. ग्रामपंचायतींनी स्थानिक लोकसहभागातून अभियान गतीने

राबवून गावांमध्ये सांडपाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असं आवाहन करनवाल यांनी केलं आहे.

****

बुलडाणा जिल्ह्यात केस गळतीची समस्या उद्भवलेल्या विविध गावांना केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज भेट देत, पीडित नागरिकांशी चर्चा केली. केस गळती कशामुळे होते आहे, याबाबत संशोधन करण्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञ आणि संशोधक यांच्या काही टीम दिल्ली, आणि चेन्नई इथून लवकरच दाखल होतील, अशी माहितीही जाधव यांनी दिली आहे.

****